## प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगाव

दि.२२/०१/२०२५

**आलोसे प्रशांत प्रभाकर इंगळे, वय ४५ वर्ष , उपकार्यकारी अभियंता, नेमणूक म.रा.वि.वि.कं.लि.ग्रामीण उपविभाग कार्यालय भुसावळ रा.प्लॉट नं.२६, फ्लॅट नं.३०१,पार्वती नगर राधेय हाईट्स खोटे नगर ,जळगाव ता.जि.जळगाव (विज वितरण विभाग वर्ग २) यांनी २०,०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत**

-------------------------------------------OOO-------------------------------------------

यातील फिर्यादी यांचे मित्र श्री.सुनिल रामकृष्ण अग्रवाल,रा.जुना सातारा,भुसावळ यांचा कुऱ्हा ता. भुसावळ येथे महालक्ष्मी स्टोन क्रेशर नावाचा व्यवसाय आहे.सदर व्यवसायासाठी NSC स्किम अंतर्गत ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ १०० के.व्ही.वरुन २०० के.व्ही. करण्यासाठीचे प्रकरण त्यांनी फिर्यादीकडे दिले होते. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी दि.२०.०१.२०२५ रोजी चोरवड येथील म.रा.वि.वि.कं.लि.चोरवड कार्यालयात जावुन सहायक अभियंता रोहन पाटील यांची भेट घेवुन ते प्रकरण त्यांचेकडे दिले होते.त्यांनी सदरची कागदपत्रे तपासुन त्यावर सही करुन ते आलोसे श्री.इंगळे उप कार्यकारी अभियंता यांची सही घेण्यासाठी फिर्यादीकडे दिले होते. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी श्री.इंगळे यांचेकडे जावुन सदरची कागदपत्रे त्यांना त्याच दिवशी दाखवली होती. आलोसे श्री.इंगळे यांनी ती कागदपत्रे तपासुन त्यावर सही करुन वरिष्ठ कार्यालयात पाठविण्याचे मोबदल्यात फिर्यादीकडे २५,०००/– रुपयांची मागणी केले बाबत दि.२२.०१.२०२५ रोजी फिर्यादी यांनी ला.प्र.वि.जळगाव घटकाचे सापळा पथकाकडे तक्रार लिहुन दिली होती.

सदर तक्रारीची दि.२२.०१.२०२५ रोजी पडताळणी केली असता वर नमुद आलोसे यांनी फिर्यादीचे व्यवसायीक मित्र श्री.सुनिल रामकृष्ण अग्रवाल,रा.जुना सातारा,भुसावळ यांचा कुऱ्हा ता.भुसावळ येथील महालक्ष्मी स्टोन क्रेशरचे व्यवसायासाठी NSC स्किम अंतर्गत ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ १०० के.व्ही.वरुन २०० के.व्ही. करण्यासाठीचे प्रकरणावर सही करुन ते वरिष्ठ कार्यालयात पाठवण्याचे मोबदल्यात फिर्यादीकडे प्रथम २५,०००/–रुपये लाच रकमेची मागणी करुन,तडजोडीअंती २०,०००/–रुपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले होते. त्याप्रमाणे वर नमुद आलोसे यांनी फिर्यादीकडुन २०,०००/–रुपये लाच रक्कम (त्यात ५००/–रु. दराच्या १० असली व एकाच नंबरच्या भारतीय बच्चोंका बँकेच्या ३० नकली नोटा) आज दि.२२.०१.२०२५ रोजी १६.४५ वा.चे सुमारास म.रा.वि.वि.कं.लि.चोरवड कक्ष कार्यालयात स्विकारली म्हणुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा.भारत तांगडे ,पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक व मा.श्री.माधव रेड्डी ,अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली असुन पुढील तपास श्री.योगेश जी.ठाकूर ,पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि.जळगाव करीत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगाव कार्यालयाशी संपर्क साधुन निर्भिडपणे या कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारीबाबत माहिती पाहीजे असल्यास खालील मोबाईल क्रमांक व दुरध्वनीवर संपर्क साधावा महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या सोईच्या दृष्टीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करण्यासाठी लँडलाईन ते लँडलाईन व मोबाईल ते लँन्डलाईन अशी टोल फ्रि नं. १०६४ ची सेवा सुरु करण्यात आली असुन सदर क्रमांकावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यप्रणाली संबंधी व करावयाच्या तक्रारी संधी नागरीकांनी संपर्क साधावा.

| अ.नं. | युनिटचे नाव | दुरध्वनी क्रमांक | टोल फ्रि नंबर |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | ०२५७ - २२३५४७७ | १०६४ |
| २ | नाशिक | ०२५३ - २५७५६२८ , २५७८२३० | १०६४ |
| ३ | अहमदनगर | ०२४१ - २४२३६७७ | १०६४ |
| ४ | धुळे | ०२५६२ - २३४०२० | १०६४ |
| ५ | नंदुरबार | ०२५६४ - २३०००९ | १०६४ |

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

योगेश जी. ठाकूर
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव